# प्रत्येक चित्रपट ही शिकण्याची प्रक्रिया

## ‘पिफ’मध्ये अभिनेत्री सीमा बिस्वास यांचे प्रतिपादन

पुणे, दि. २० जानेवारी २०२६ : प्रत्येक चित्रपट ही शिकण्याची प्रक्रिया असते. मी अनेक दिग्दर्शकांकडून शिकत गेले. तरी प्रत्येक चित्रपट हा माझ्यासाठी नवीन अनुभव असतो. २४ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'मर्डर्स टू क्लोज अँड लव्ह टू फार' या चित्रपटातील अभिनेत्री सीमा बिस्वास यांनी संवाद साधला.

'मर्डर्स टू क्लोज अँड लव्ह टू फार' हा चित्रपट मंजू बोरा आणि इस्रायलचे दिग्दर्शक डॅन वॉलमन यांनी संयुक्तपणे तयार केला आहे. त्यामध्ये अभिनेत्री म्हणून काम केलेल्या सीमा बिस्वास म्हणाल्या, मी प्रत्येक चित्रपटातून गोष्टी शिकत जाते. त्यातून मी स्वतः समृद्ध होत जाते.
चित्रपटाविषयी सीमा म्हणाल्या, "ही कथा साधी असली तरी ती अत्यंत अर्थपूर्ण आणि विचारप्रवर्तक होती. हा चित्रपट एका संवेदनशील विषयावर आहे, पण तो भपकेबाज नसून अत्यंत साध्या पद्धतीने मांडला आहे."

**वडील मुलीच्या नाट्यभोवती फिरणारा ‘द्विधा’**

निलेश नाईक दिग्दर्शित आणि विदुला नाईक निर्मित मराठी चित्रपट ‘द्विधा’ हा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) दाखवण्यात आला. त्यांनतर दिग्दर्शक निलेश नाईक, अभिनेत्री मानसी कुलकर्णी यांनी संवाद साधला.
वडील आणि मुलीच्या नात्यावर आधारित असलेला हा चित्रपट, परदेशात स्थायिक झालेले पिढी आणि भारतातील पालक या विषयावर प्रकाश टाकतो. दीर्घकाळानंतर सिनेमात परतणारे सतीश पुळेकर या चित्रपटात मुख्य भूमिकेत आहेत. दिग्दर्शक निलेश नाईक म्हणाले, "कधीही आपल्या आई-बाबांना विसरू नका. ते लहानपणी आपल्यासाठी जे काही करतात, त्याचप्रमाणे एका वयानंतर आपणही त्यांना मानसिक आधार देण हे आपले कर्तव्य आहे, हे या चित्रपटातून सांगण्याचा प्रयत्न आहे.
अभिनेत्री मानसी कुलकर्णी म्हणाली की विद्यार्थी म्हणून जो महोत्सव पाहत आले, तिथे आपला चित्रपट पाहणे ही खूपच आनंदाची गोष्ट आहे.

**खासी हिल्स मध्ये घडणारी घटना ‘एलिसियन फील्ड’**

व्यक्तीच्या निधनानंतर निर्माण होणाऱ्या मानवी भावभावना, वेदना आणि व्यक्तींवर होणारे परिणाम, त्यांचे स्वतःचे आयुष्य, असा आशय मांडणारा दिग्दर्शक प्रदीप कुब्राह यांचा ‘एलिसियन फील्ड’ आज

दाखवण्यात आला. मेघालयातील खासी हिल्स मध्ये एका छोट्याशा गावात राहणाऱ्या सहा व्यक्तींच्या दैनंदिन जीवनाचा प्रवास दाखवताना मानवी भावभावनांचे नवे पैलू उलगडत जातात. बेलिंडा या पात्राच्या मृत्यूपासून चित्रपटाची सुरुवात होते आणि पुढे कोणाचा मृत्यू होणार, या उत्सुकतेतून कथा प्रेक्षकांना गुंतवून ठेवते. या चित्रपटातील पुरुष पात्रांची नावे कंप्लीट, लिव्हिंगस्टोन, फ्रायडे, प्रॉमिस अशी वेगळी असून, प्रत्येक नावामागे त्या व्यक्तीशी निगडित एक सुंदर आठवण आणि कथा प्रेक्षकांसमोर येते.

दिग्दर्शक प्रदीप कुब्राह यांनी सांगितले की, चित्रपटातील सूक्ष्म तपशील आणि अभिनयाच्या माध्यमातून कथा बोलकी करण्यावर त्यांचा चित्रपटामध्ये प्रयत्न आहे.

**प्रेम आणि संघर्ष यांच्यातील नाजूक संबंध 'अ सॅड अँड ब्युटीफुल वर्ल्ड'**

प्रेम आणि संघर्ष यांच्यातील नाजूक संबंधांवर प्रकाश टाकणारा सायरिल अरिस दिग्दर्शित लेबनिझ चित्रपट 'अ सॅड अँड ब्युटीफुल वर्ल्ड' आज दाखवण्यात आला. यावेळी मुख्य अभिनेता हसन अकिल उपस्थित होते.

हा चित्रपट लेबनॉनमधील सतत चालणाऱ्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर निनो आणि यास्मिना या दोन व्यक्तींच्या आयुष्यातील प्रेम आणि संघर्षाची गोष्ट सांगतो.

महोत्सवात उपस्थित असलेले मुख्य अभिनेता हसन अकिल यांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले, "भारत हा माझा आवडता देश आहे. त्यामुळे पुणे चित्रपट महोत्सवात येण, हे माझ्यासाठी चांगली संधी आहे. आम्ही अशा देशात राहतो जिथे नेहमीच सामाजिक अस्थिरता पाहायला मिळते. त्याच पार्श्वभूमीवर प्रेम आणि विनोदाचा बंध बांधून हा चित्रपट बनवण्यात आला आहे." ते म्हणाले की 'अ सॅड अँड ब्युटीफुल वर्ल्ड' हा चित्रपट केवळ एक प्रेमकथा नसून तो मानवी भावनांची आणि संघर्षाचे चित्रण आहे.

**प्रत्येकाच्या मनात एकच सिनेमा असायला हवा : किशोर कदम**

सिनेमा हा अनेक तुकड्यांचा प्रवास असतो; मात्र संपूर्ण टीमच्या मनात एकच सिनेमा निर्माण झाला की तो खऱ्या अर्थाने जिवंत होतो, प्रत्येक कलाकाराच्या मनात तोच सिनेमा रुजवणे हे दिग्दर्शकाचे खरे यश असते, असे मत ज्येष्ठ अभिनेता किशोर कदम यांनी पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात व्यक्त केले.

'गोंधळ' या चित्रपटात अभिनेते किशोर कदम यांनी काम केले आहे. ते म्हणाले, की गोंधळ परंपरा ही कविता, गाणे किंवा प्रयोगामुळे बदलत नाही. ती जशी' आहे तशीच ठोस आणि परंपरागत राहते. सिनेमा तिचा सन्मान करतो."

संतोष डावखर दिग्दर्शित 'गोंधळ' या चित्रपटात गोंधळ या परंपरेभोवती फिरणारा सामाजिक-मानसिक थरार मांडण्यात आला आहे. श्रद्धा, सत्ता आणि परंपरेतील संघर्ष प्रभावीपणे उलगडणारा हा सिनेमा प्रेक्षकांना केवळ पाहायला नाही, तर अनुभवायला भाग पाडतो.